परिषदेत व्यक्त केले. लाख रुपयांचे मुद्रांक शुल्क चुकविले यांचीही नावे आहेत.

# सममूल्यताच राज्यघटनेचे सर्वोच्च तत्त्वज्ञान

## खासदार डॉ. वाघमारे : प्राचार्य शिवाजी भोसले व्याख्यानमाला

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : 'एक व्यक्ती, एक मूल्य' ही सममूल्यताच भारतीय राज्यघटनेचे सर्वोच्च तत्त्वज्ञान आहे. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये देव नव्हे, तर भारतीय नागरिकाला सर्वोच्च स्थान देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खऱ्या आणि व्यापक अर्थाने लोकशाहीचे सूतोवाच करून ठेवल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत आणि खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र व महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. अशोक



डॉ. जनार्दन वाघमारे

भोईटे होते.

'भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान' विषयावर खासदार वाघमारे यांनी संवाद साधला. ते म्हणाले, ''भारतीय जनमानसाला योग्य दिशा देण्याचे काम राज्यघटनेने केले. राज्यघटनेने नागरिकांना लोकशाही व्यवस्थेत राजकीयदृष्ट्या 'एक व्यक्ती, एक मत' अशा प्रकारे दिलेले स्थान महत्त्वपूर्ण आहे. सामाजिक व आर्थिकदृष्ट्या लोकशाही सक्षम बनविण्यासाठी 'एक व्यक्ती, एक मूल्य' विधान सर्वार्थाने उपयुक्त आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि धर्मनिरपेक्षता ही महामूल्ये समाजाला दिलेली महान देणगी आहे. राज्यघटनेच्या माध्यमातून घटनाकारांनी निर्माण केलेली आधुनिक मूल्यव्यवस्था आणि परंपरेने चालत आलेली मूल्यव्यवस्था यांच्या परस्परविरोधी भूमिकांचा संघर्ष अटळ आहे. या विरोधाभासावर मात करण्याचे आव्हान समाजापुढे आहे.''

डॉ. सुधीर पिटके यांचा पीएच. डी. मिळविल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार झाला. महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचे अध्यक्ष डॉ. ज. रा. दाभोळे, प्रा. अरुण भोसले, डॉ. भारती पाटील, डॉ. मागोराव कुंभार, प्रा. अशोक चौसाळकर, प्रा. आर. जी. दांडगे, प्रा. राजन गवस, प्रा. प्रकाश पवार, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. भगवान माने आदी उपस्थित होते. श्रेयस मोहिते व अनिकेत गुरव यांनी सूत्रसंचालन केले.

## आधुनिकता हा ऐतिहासिक टप्पा : दत्ता देसाई

कोल्हापूर, ता. २० : 'सतराव्या शतकापूर्वीचा काळ हा मध्ययुग किंवा सरंजामी, जातीय उतरंडीचा असा आधुनिकपूर्व काळ होता. आधुनिकता हा एक ऐतिहासिक टप्पा होता. त्यात शंका, प्रश्न, समीक्षा, चिकित्सा या मूल्यांचा उदय झाला. विवेकवाद, वस्तुनिष्ठता आणि व्यक्तिस्वातंत्र्य सकारात्मक मूल्यांचा विकास या वेळी झाला,' असे प्रतिपादन दत्ता देसाई यांनी केले.

विदेशी भाषा विभागाच्या वतीने झालेल्या 'आधुनिकता, उत्तर आधुनिकता व त्यापलीकडे' या विषयावरील उद्बोधन कार्यशाळेत ते बोलत होते. आधुनिक, आधुनिकता, आधुनिकतावाद व आधुनिकीकरण या संकल्पना स्पष्ट करून त्यांनी



दत्ता देसाई

आधुनिकतेच्या मर्यादाही स्पष्ट केल्या. आधुनिकतेच्या सिद्धांताची मांडणी ही युरोपकेंद्री असून, ती सर्वसमावेशक नाही, असेही देसाई यांनी सांगितले. डॉ. राजन गवस, विभागाच्या प्रभारी विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे, शामल म्हाकवे, अभिषेक जोशी आदी उपस्थित होते.